**जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर**
**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय**
E-Mail – zpcsn@rediffmail.com
**दूरध्वनी क्र. 0240 - 2331291**
संकेत स्थळ - www.chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in

---

जा.क्र.2025/मुकाअ/स्वीयसहा/कावि/ 796 दिनांक – 20 मार्च 2025

**प्रति,**

सर्व खाते प्रमुख,
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

**विषय :- मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे संचिका सादर करताना घ्यावयाची दक्षता.**

उपरोक्त विषयी सूचित करण्यात येते की, मी दिनांक 19 मार्च 2025 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर पदी रुजू झालेलो असून प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता व अधिक परिणामकारकता यावी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात संचिका सादर करताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करावे.

1) प्रत्येक संचिकेचे टिपणी विभाग, पत्रव्यवहार विभाग असे विभाग असतील व मध्ये दुभाजक पान असेल. टिपणी विभागातील पानांचे पृष्ठांकन टि-1, टि-2. असे तर पत्रव्यवहार विभागाचे पृष्ठांकन पवि-1, पवि-2. असे असेल.

2) टिपणीत विषयासंबंधी अनुषंगिक पत्रव्यवहार व संदर्भाधिन शासन निर्णय संचिकेस संलग्न करुन त्यास FLAG लावून सोबत सादर केलेला असावा. तसेच ज्या प्रकरणात शासनास अथवा वरिष्ठ कार्यालयास पत्र व्यवहार करावयाचा आहे, अशा प्रकरणी पूर्वोदाहरण म्हणून यापूर्वी सादर केलेल्या पत्रव्यवहाराची छायांकित प्रत सुलभ संदर्भासाठी संचिकेसह सादर करावे.

3) टिपणी सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांपासून सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:चे पदनामासोबत नाव नमूद करावे.

4) विभाग प्रमुखांनी संचिकेमध्ये मान्यतेस्तव सादर, स्वाक्षरीस्तव सादर व उचित आदेशार्थ सादर अशा प्रकारचे मोघम अभिप्राय न नोंदविता संचिकेत **प्रचलित शासन निर्णयानुसार प्रकरणी मान्यता प्रदान करण्यास हरकत असावी किंवा नसावी अशा स्वरूपाचे स्वयं स्पष्ट अभिप्राय** नमूद करावेत.

5) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावाने होणाऱ्या पत्रव्यवहारावर तसेच आदेशावर **अंकित,** भाप्रसे असे अचूक नाव नमूद करावे व विभाग प्रमुखांनी नावाच्या अचूकतेबाबत दक्षता घ्यावी.

6) आर्थिक बाबी नमूद असलेल्या संचिका संबंधित विभागाच्या लेखा शाखेच्या अभिप्रायासह वित्त विभागामार्फत सादर होतील याची दक्षता घ्यावी. यामध्ये लेखाशीर्ष, मंजूर तरतूद, खर्च व नियोजनासाठी उपलब्ध तरतूद या बाबी नमूद करुन वित्त विभागाने आपले स्पष्ट अभिप्राय दयावेत. तसेच आस्थापना विषयक संचिका सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासह सादर होतील याची दक्षता घ्यावी.

7) विभाग प्रमुखांनी आपल्याकडील प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करावी. प्रत्येक विभागाकडे प्रकरणाचा तपशील दर्शविणारे रजिस्टर ठेवावे आणि विभागाकडील सर्व प्रकारच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांची एकत्रित यादी तयार करुन त्याची सध्यस्थिती दर्शविणारी यादी सादर करावी.

अतिसंवेदनशील प्रकरणावर मुकाअ यांचे स्तरावर तसेच संवेदनशील प्रकरणावर स्वत: विभागप्रमुखांनी तर उर्वरित प्रकरणावर शाखा प्रमुखांनी संबंधित वकिलांशी चर्चा करुन न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्यासाठी कार्यवाही करावी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या अनुषंगाने मोहिम राबवावी.

8) न्यायालयीन प्रकरणे, शासनाकडील प्रकरणे, लोकआयुक्त प्रकरणे, लेखा परिच्छेद, माहिती अधिकारातंर्गत प्रकरणे, PRC, विधानमंडळ तसेच अन्य संवैधानिक प्राधिकाऱ्यांकडील प्रकरणांचे स्वतंत्र अदयावत रजिस्टर ठेऊन त्याबाबत पाक्षीक गोषवारा काढावा व कर्मचाऱ्यांच्या पाक्षीक बैठका घ्यावात आणि यासंदर्भातील इतिवृत्तांचे जतन करावे.

9) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पृष्ठांकित केलेला पत्रव्यवहार, अभ्यांगताचे विनंती अर्ज, निवेदनांवर दिलेले निर्देश यावर विभाग प्रमुखांनी तात्काळ कार्यवाही करून प्रकरणात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

10) अभ्यागंत, ग्रामस्थ व जनतेच्या शंकाचे निरासन विभाग प्रमुख स्तरावर होईल याची दक्षता घ्यावी. अत्यंत अपवादात्मक परिस्थतीत ग्रामस्थांवर/अभ्यागंतावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेण्याची निकड यावी.

11) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक 02 फेब्रुवारी 2023 नुसार शासकीय कामकाजात संगणकाचा प्रभावीपणे अधिकाधिक वापर करून गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता आणून निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी या उद्देशाने दिनांक 01 एप्रिल 2023 पासून ई - ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार विभाग प्रमुख यांनी संचिका व पत्रव्यवहार करताना ई ऑफिस प्रणालीद्वारे वापर काटेकोरपणे करावे.

**अंकित**, भाप्रसे
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

**प्रत :-**

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
2) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरीत/-**
**अंकित**, भाप्रसे
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.